दुरध्वनी क्र. ०७२४-२४२०२७७

जा.क्रमांक:औसौप्र/औ.वि.संप./ १९९७ /२०१२/२

सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय,
अन्न व औषध प्रशासन म.रा.
आकाशवाणी रोड, सिव्हील लाईन,अकोला.
दिनांक :- ११ / १० / २०१२

प्रति,
अध्यक्ष,
जिल्हा केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोसिएशप,
अकोला / वाशिम.

विषय:-दिनांक १६, १७ व १८ ऑक्टोंबर २०१२ चा औषधी व्यापाऱ्यांचा नियोजीत राज्यव्यापी संप.

संदर्भ:- मा.सह आयुक्त (मुख्यालय), अन्न व औषध प्रशासन म.रा.मुंबई यांचा दिनांक १०.१०.२०१२ रोजीचा दुरध्वनी संदेश.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र रांज्यातील सर्व ठोक व किरकोळ औषध विक्रेते दिनांक १६, १७ व १८ ऑक्टोंबर २०१२ रोजी संपावर जाणार आहेत. आपण अकोला जिल्हा केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष असल्याकारणाने मी आपणास जाणीव करुन देऊ इच्छीतो की औषध विक्री सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये मोडते त्यामुळे आपण जर संपावर गेला तर सामान्य जनतेची औषधी मिळण्याचे दृष्टने कुचंबणा होऊ शकते करीता जनतेला औषधी मिळणेस्तव कोणताही त्रास होऊ नये म्हणून अकोला / वाशिम जिल्हयातील औषधी विक्रेत्यांनी संपावर जाऊ नये अशी विनंती या पत्राव्दारे आपणास करीत आहे.

औषधी विक्रेत्यांचा संपावर जाण्याचा निश्चय असेल तर अकोला / वाशिम शहरात प्रत्येक भागामध्ये किमान २ ते ३ दुकाने, तसेच तालुका स्तरावर देखील किमान २ ते ३ दुकाने सुरु ठेऊन जनतेला औषध मिळावी या दृष्टीने कारवाई घेण्याची आपणास विनंती करीत आहे. ज्या गावी एकच औषधी दुकान आहे अशा विक्रेत्याना संपावर संपावर जाण्याची सक्ती करु नये. जेणे करुन खेडयातील जनतेचे हाल होणार नाही. जी औषधी दुकाने संप काळात उघडी राहतील त्या सर्व औषधी दुकानाची यादी व दुरध्वनी क्रमांक / मोबाईल नंबर दिनांक १२.१०.२०१२ चे सायंकाळी ५.३० पर्यन्त या कार्यालयात आणुन द्यावी. तसेच जाहिरात माध्यमातुन त्यांना प्रसिध्दी देण्यात यावी. कोणत्याही प्रकारे जनतेचे हाल होणार नाही त्या दृष्टीने आपण स्वत: लक्ष घालुन काळजी घ्यावी ही विनंती.

आपला,

( स.मा.दलाल )
सहाय्यक आयुक्त
अन्न व औषध प्रशासन म.रा.
अकोला.

कृपया मागे पहा..

प्रतः- सस्नेह सादर

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला / वाशिम

२. मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन म.रा.मुंबई-५१.

३. मा.सह आयुक्त (अमरावती विभाग), अन्न व औषध प्रशासन म.रा.अमरावती.

४. मा. पोलीस अधिकक्ष, मुख्यालय, अकोला / वाशिम

प्रत-

१. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अकोला / वाशिम

२. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला / वाशिम यांना माहितीस्तव कळविण्यात येत असून त्यांना विनंती करण्यात येते की, संप काळात त्यांचे रुग्णालयात औषधी उपचारार्थ औषधी उपलब्ध रहातील या दृष्टीने औषधाचा साठा करुन ठेवण्याची विनंती आहे.

३. अध्यक्ष, इंडियान मेडिकल असोसिएशन, अकोला / वाशिम यांना माहितीस्तव पाठविण्यात येत असून त्यांनी या बाबत जिल्हयातील सर्व वैद्यकिय व्यवसायीकांना औषधी साठा त्यांचेकडे उपलब्ध होईल या दृष्टीने दक्षता घेण्याबाबत कळविावे.

४. श्री चं.का.डांगे, औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन म.रा.अकोला.

५. श्री म.श्री.चौधरी, औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन म.रा.अकोला.

६. श्री स.मो.राठोड, औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन म.रा.अकोला.

(७) वैद्यकिय अधीक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला

(८) मा. अध्यक्ष, नॅशनल इंटिग्रेटेड मेडीकल असोसिएशन, अकोला

स.आ.अकोला